# महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा संयुक्त (पूर्व) परीक्षा-२०१८
## घोषणा
### जाहिरात क्रमांक (२६/२०१८)

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत दिनांक ०८ जुलै, २०१८ रोजी घेण्यात आलेल्या महाराष्ट्र अभियांत्रिकी सेवा संयुक्त (पूर्व) परीक्षा-२०१८ चा निकाल **दिनांक ०६ ऑक्टोबर, २०१८** रोजी जाहीर करण्यात आला आहे. सदर पूर्व परीक्षेत अर्हताप्राप्त ठरलेल्या उमेदवारांच्या बैठक क्रमांकाची यादी व गुणांची सीमारेषा आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे.

**२. प्रस्तुत पूर्व परीक्षेसाठी उमेदवारांनी ऑनलाईन पध्दतीने केलेल्या अर्जात दिलेल्या माहितीच्या आधारे, त्यांची पात्रता तपासण्याच्या अटीच्या अधीन राहून, पूर्व परीक्षेच्या निकालाआधारे मुख्य परीक्षेस पात्र ठरलेल्या उमेदवारांपैकी विहित कालावधीत मुख्य परीक्षेसाठी अर्ज करणा-या व परीक्षा शुल्क भरणा-या अर्हताप्राप्त उमेदवारांनाच मुख्य परीक्षेस प्रवेश देण्यात येईल. अशा तपासणीनुसार अपात्र ठरणाऱ्या उमेदवारांची उमेदवारी आयोगाकडून कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल.**

**३. महाराष्ट्र विद्युत अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा - २०१८ ही शनिवार, दिनांक २४ नोव्हेंबर, २०१८ रोजी घेण्यात येणार असून महाराष्ट्र स्थापत्य अभियांत्रिकी सेवा (मुख्य) परीक्षा - २०१८ ही रविवार, दिनांक २५ नोव्हेंबर, २०१८ रोजी घेण्यात येईल.**

**४.** प्रस्तुत निकालाआधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या व **अर्जात प्राविण्यप्राप्त (गुणवत्ताधारक) खेळाडूचा दावा केलेल्या उमेदवारांनी शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक १ जुलै, २०१६ रोजीच्या शासन निर्णयानुसार व त्यास अनुसरुन प्रसिध्द करण्यात आलेले दिनांक १८ ऑगस्ट, २०१६ रोजीचे शुध्दीपत्रक आणि तद्नंतर शासनाने या संदर्भात वेळोवेळी निर्गमित केलेल्या आदेशानुसार विषयांकित गट - 'ब' पदांसाठी निश्चित केलेली क्रीडा विषयक अर्हता धारण करीत असल्याबाबत, पूर्व परीक्षेचा अर्ज सादर करण्याचा अंतिम दिनांकाचे म्हणजेच दिनांक २४ मे, २०१८ रोजीचे किंवा तत्पूर्वीचे क्रीडा प्रमाणपत्र व विभागीय क्रीडा उपसंचालकांचा, क्रीडा प्रमाणपत्र पडताळणीबाबतचा अहवाल सादर करणे अनिवार्य राहील.**

**५.** प्रस्तुत परीक्षेचा निकाल समांतर आरक्षणाच्या मुद्यासंदर्भात तसेच अन्य मुद्यांसंदर्भात विविध मा. न्यायालयात/ मा. न्यायाधिकरणात दाखल करण्यात आलेल्या न्यायिक प्रकरणातील अंतिम न्यायनिर्णयाच्या अधीन राहून जाहीर करण्यात आला आहे.

**६.** प्रस्तुत पूर्व परीक्षेच्या निकालाच्या आधारे मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना वैयक्तिकरित्या आयोगाकडील नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावर एस.एम.एस. व्दारे कळविण्यात येईल. त्यावेळी उमेदवाराने मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी आयोगाने विहित केलेल्या ऑनलाईन पध्दतीने परीक्षा केंद्र निवडून परीक्षा-शुल्क सादर करणे आवश्यक राहील. त्याशिवाय उमेदवारास मुख्य परीक्षेच्या प्रवेशासाठी पात्र समजण्यात येणार नाही. तसेच, पूर्व परीक्षेसाठी सादर केलेल्या अर्जातील दावेच मुख्य परीक्षेकरिता स्वीकारार्ह ठरतील.

**ठिकाण:- मुंबई**
**दिनांक:- ०६ ऑक्टोबर, २०१८**

**उपसचिव (परीक्षा-१)**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई**